# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२

जावक क्र. : यचममुवि/कुअ/२०२५/ दिनांक : १८.०६.२०२५

## परिपत्रक

आपल्या विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत दिल्या जाणाऱ्या **'विशाखा काव्य पुरस्कार'** समारंभ सोमवार, दि. ३० जून, २०२५ रोजी दु. ४.०० वाजता मा. कुलगुरूंच्या अनुमतीने निश्चित झाला आहे.

"कुसुमाग्रजांच्या ज्ञानपीठ पुरस्कार विजेता काव्यसंग्रह **'विशाखा'** या नावाने **'विशाखा काव्य पुरस्कार'** विद्यापीठातर्फे प्रथमतः प्रकाशित काव्यसंग्रहाला दिला जातो. सन २०१८ ते २०२४ पर्यंतच्या एकूण २२ पुरस्कारार्थींना हा पुरस्कार मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली व शुभहस्ते दिला जाणार आहे.

सदर समारंभ 'शैक्षणिक सभागृह' येथे पार पडणार असून कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मा. प्र-कुलगुरू आणि मा. कुलसचिव उपस्थित असतील."

विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी / कर्मचारी, करारावरील अधिकारी/कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, बी.बी.ए. प्रशिक्षणार्थी व दैनंदिन वेतनावरील कर्मचारी यांनी पुरस्कार वितरण समारंभासाठी उपस्थित राहावे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक-४२२ २२२.

(दिलीप भरड)
कुलसचिव

प्रत माहितीस्तव- मा. कुलगुरू कार्यालय
मा. प्र-कुलगुरू कार्यालय

प्रत : सर्व विद्याशाखा संचालक, विभाग, केंद्र, कक्ष प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

Scanned with OKEN Scanner